विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मंठ्यात शेतकरी संवाद व दुष्काळ पाहणी दौरा

## विजय वाडेट्टीवार यांचा सरकारवर हल्लाबोल

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यात यंदा निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मंठा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विवेक घारे यांच्या पुढाकाराने शेतकरी संवाद व दुष्काळ पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्यात काँग्रेसचे विधिमंडळ नेते तथा आमदार विजय वाडेट्टीवार, माजी आमदार राजेश राठोड, जालना जिल्हा काँग्रेस अध्यक्ष कल्याण दळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडचणी, पिकांची परिस्थिती, उत्पादनातील घट, आर्थिक संकट तसेच कर्जबाजारीपणाबाबत माहिती घेण्यात आली. दुष्काळामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून सरकारने तातडीने ठोस मदत करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकरी संवाद कार्यक्रमात बोलताना काँग्रेसचे विधिमंडळ नेते तथा आमदार विजय वाडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. सध्याची परिस्थिती अत्यंत गंभीर असून १९७२ च्या दुष्काळापेक्षाही मोठा दुष्काळ असल्याचा दावा त्यांनी केला.



शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून कर्जबाजारीपणा आणि पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही चिंताजनक असल्याचे वाडेट्टीवार यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी घुगे नावाच्या ४२ वर्षीय शेतकऱ्याच्या आत्महत्येचा उल्लेख करत शेतकरी कुटुंबांवर ओढवलेल्या संकटाची तीव्रता अधोरेखित केली.

**"शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा"**

"शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्याशिवाय त्यांना या संकटातून बाहेर काढणे कठीण आहे. तब्बल १.५ लाख कोटी रुपयांची कर्जमाफी केली, तर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होऊ शकतो," अशी भूमिका विजय वाडेट्टीवार यांनी मांडली.

यापूर्वी झालेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांची फसवी कर्जमाफी होती, असा आरोपही त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार कमी *(पान २ वर)*

# जालना ग्रामीण जिल्हयाच्या वतीने सेवा ज्योती यात्रा व विकसित भारत संकल्प सभा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत जालना ग्रामीण जिल्हयाच्या वतीने जालना येथील भाजपा जिल्हा कार्यालयात 'सेवा ज्योती यात्रा व विकसित भारत संकल्प सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारत माता, राष्ट्रपुरुष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

या कार्यक्रमास माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करतांना त्यांनी सेवा, संघटनशक्ती आणि राष्ट्रहिताच्या विचारांवर भर देत भाजपा कार्यकर्त्यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून जनसेवेचे कार्य अधिक प्रभावीपणे करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकासाच्या विविध क्षेत्रांत घेतलेली झेप, सर्वसामान्य नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजना तसेच 'विकसित भारत निर्मितीचे ध्येय याबाबत यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात प्रत्येक नागरिकाचा सहभाग वाढविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे यांनी यावेळी भाजपा ही केवळ राजकीय संघटना नसून सेवा, संस्कार आणि राष्ट्रसमर्पणाची चळवळ असल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून, या विकासयात्रेत भाजपा कार्यकर्त्यांनी जनसेवेच्या माध्यमातून सक्रिय योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास जालना माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अवधूत नाना खडके, दिपक भैय्या *(पान २ वर)*

# सातबाऱ्यावरील नावे दुरुस्त करण्यासाठी ५० हजारांची लाच; ग्राम महसूल अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**जालना - प्रतिनिधी**

शेतीच्या सातबारा उताऱ्यावरील इतर अधिकारातील नावे दुरुस्त करण्याच्या कामासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ग्राम महसूल अधिकारी भाऊसाहेब जगन्नाथ गवारे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जालना पथकाने रंगेहाथ पकडले. बुधवारी (दि. ७) रात्री ८.४० वाजता जालना शहरातील भोकरदन नाका परिसरातील आस्था हॉस्पिटल येथे ही कारवाई करण्यात आली. भाऊसाहेब गवारे (वय ४२) हे परतूर तहसील कार्यालयांतर्गत रोहिणा (बु.) सज्जावर ग्राम महसूल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ते जालना शहरातील शिक्षक कॉलनी, श्रीकृष्ण-रुक्मिणी नगर, नवीन मोंढा रोड, भोकरदन नाका परिसरात राहतात.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे शेती व खासगी नोकरीचा व्यवसाय करतात. त्यांनी रोहिणा खुर्द येथील गट क्रमांक १०४ मधील ४४ आर शेतजमीन शेतकऱ्याकडून खरेदी करण्याचे ठरविले होते. त्यासाठी १०० रुपयांच्या बाँडवर इसारपावतीही करून घेण्यात आली होती. मात्र, संबंधित शेतजमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील इतर अधिकारातील नावे दुरुस्त करणे आवश्यक होते.

या कामासाठी तक्रारदारांनी १ ऑक्टोबर रोजी सकाळी जालन्यात भाऊसाहेब गवारे यांची भेट घेतली. त्यावेळी संबंधित काम करून देण्यासाठी ५० हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी गवारे यांनी केल्याचा आरोप आहे. यानंतर तक्रारदारांनी ६ ऑक्टोबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे लेखी तक्रार दिली.

तक्रारीची पडताळणी करण्यासाठी एसीबीच्या पथकाने कारवाई केली. ६ ऑक्टोबर रोजी तक्रारदार पंचासह परतूर येथे गवारे यांच्या खासगी कार्यालयात गेले असता, कामासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचे आणि ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीदरम्यान निष्पन्न झाल्याचे एसीबीने म्हटले आहे.

त्यानंतर बुधवारी ७ ऑक्टोबर रोजी सापळा रचण्यात आला. रात्री ८.४० वाजता भोकरदन नाका येथील आस्था हॉस्पिटल परिसरात तक्रारदाराकडून पंचांसमक्ष ५० हजार रुपये स्वीकारताना गवारे यांना त्यांच्या *(पान २ वर)*

# कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात जिल्हास्तरीय आविष्कार : २०२६-२७चे बक्षीस वितरण संपन्न

**परभणी - प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय "आविष्कर : २०२६-२७" हा संशोधन महोत्सव कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय इथे दि. ०७ ऑक्टोबर २०२६ (बुधवार) रोजी आयोजित करण्यात आला होता. याचे बक्षीस वितरण कार्यक्रम सायंकाळी ४ वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाला विद्यापीठ




अविष्कार सहसमन्वयक डॉ.अर्चना साबळे, परीक्षक डॉ कांचन नांदेडकर, डॉ. स्मिता भोपी, डॉ.पल्लवी कांबळे, डॉ.कल्पना जोंधळे, डॉ प्रदीप देशमुख, प्राचार्य डॉ रामचंद्र भिसे हे उपस्थित होते. या संशोधन महोत्सवात पदवी (), पदव्युत्तर () आणि पीपीजी () असे तीन स्तरावर परभणी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील एकूण ७६ प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. एकूण सहा विभागामध्ये विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. ज्यामध्ये मानव्यशास्त्र, भाषा आणि ललित कला यामध्ये ११ सहभागी, वाणिज्य, व्यवस्थापन आणि *(पान २ वर)*

# दुष्काळ निवारणासाठी जालना जिल्ह्यातील थेंब न् थेंब पाण्याचे नियोजन करा

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे प्रशासनाला निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत दुष्काळ परिस्थिती जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा, पीक नुकसान, पीकविमा आणि रोजगार हमीच्या कामांचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश पशुसंवर्धन व पर्यावरणमंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जालना जिल्हा प्रशासनाला दिले. उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी टँकरच्या प्रत्येक फेरीचे जीपीएसद्वारे नियंत्रण, टँकर ज्या ठिकाणी उभा राहतो तेथे जलपुनर्भरणाची व्यवस्था आणि नदी-नाल्यांचे खोलीकरण, पुनर्जीवन व जलस्रोतांच्या बळकटीकरणावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री पंकजा




मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक घेतली. जालना जिल्ह्यातील पिकांचे पंचनामे, पीकविमा, धरणांतील पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चारा, टँकर, रोजगार हमी योजना तसेच शहरी भागातील पाणीपुरवठ्याचा यावेळी आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जालना महापालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा काटेकोर वापर करावा. जिल्हाधिकाऱ्यांनी पिण्याचे *(पान २ वर)*

# माणुसकीचा आधारवड हरपला; नानांच्या आठवणींतून सेवाकार्याची प्रेरणा कायम- भाऊसाहेब घुगे

ज्येष्ठ अभिनेते, समाजसेवक आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, दुष्काळग्रस्त व वंचित घटकांसाठी आयुष्यभर कार्य करणारे नाना पाटेकर यांच्या निधनाने माणुसकीचा आधारवड हरपला आहे. नानांच्या जाण्याने केवळ कला आणि समाजसेवेच्या क्षेत्राचीच नव्हे, तर माझ्यासारख्या त्यांच्या सहवासातून समाजसेवेची प्रेरणा घेणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांची मोठी हानी झाली आहे.

नानांशी माझे संबंध केवळ नाम फाउंडेशनच्या कामापुरते मर्यादित नव्हते. २०१६ पासून नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, राजाभाऊ शेळके आणि गणेश थोरात यांच्या



माध्यमातून मी नाम फाउंडेशनच्या कार्याशी जोडला गेलो आणि जालना जिल्हा समन्वयक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. या काळात नानांचे शेतकरी आणि समाजातील वंचित घटकांविषयीचे प्रेम, संवेदनशीलता आणि तळमळ जवळून अनुभवता आली.

**भोरडी नदीच्या पुनरुज्जीवनात 'नाम'चा मोलाचा हातभार**

जालना जिल्ह्यातील भोरडी नदीच्या खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामाला नाम फाउंडेशनने दिलेले सहकार्य माझ्या कायम स्मरणात राहील. या कामामुळे नदीपात्राची जलधारण क्षमता वाढली, मोठ्या प्रमाणात जलसाठा निर्माण झाला आणि त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना झाला. या जलसंधारणाच्या कामामुळे सुमारे हजार एकर शेती ओलिताखाली येण्यास मदत झाली.

पाणी हा शेतकऱ्याच्या जीवनाचा आधार आहे, हे नाना नेहमी सांगायचे. त्यामुळे जलसंधारण, नदी-नाले पुनरुज्जीवन आणि शेतीला पाणी उपलब्ध करून देण्याच्या कामाला त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. भोरडी नदीच्या कामातून त्यांची हीच जलसंवर्धनाची भूमिका प्रत्यक्षात उतरली.

**संकटात धावून जाणारे 'नाम'**

जालना जिल्ह्यात कोरोना महामारीच्या काळात गोरगरीब, गरजू आणि वंचित कुटुंबांना अन्नधान्य व किराणा साहित्याची मोठ्या प्रमाणावर मदत नाम फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली. २०१९ ते २०२१ या कालावधीत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना प्रत्येकी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. जालना जिल्ह्यासाठी या माध्यमातून सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांची मदत करण्यात आली.

दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, या भावनेतून किराणा किटचे वाटप करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना ज्वारी आणि हरभऱ्याचे *(पान २ वर)*

# जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यांत सेवा संकल्प अभियान अंतर्गत महाराजस्व समाधान शिबिर

**जालना - प्रतिनिधी**

नागरिकांच्या विविध महसूलविषयक अडचणींचे स्थानिक पातळीवर निराकरण करण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांमध्ये 'सेवा संकल्प अभियान' उपक्रमांतर्गत महसुल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला. जिल्ह्यातील जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, मंठा, परतूर, घनसावंगी आणि अंबड या आठही तालुक्यांमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण




भागातील नागरिकांना महसूल कार्यालयांमध्ये वारंवार ये-जा करावी लागू नये, तसेच त्यांच्या प्रलंबित कामांचा जलदगतीने निपटारा व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांच्या विविध महसूलविषयक समस्या व अर्ज स्वीकारून त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात आली. विविध दाखले, फेरफार नोंदी, जमीनविषयक प्रकरणे, वारस नोंदी तसेच महसूल विभागाशी संबंधित इतर कामांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेत त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न केले.

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या शिबिरामुळे महसूल प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ होण्यास मदत झाली.

# संपादकीय...

## कागदावरील परवाना नव्हे, प्रत्यक्ष सुरक्षितता महत्त्वाची ?

दिवाळीचा उत्सव आनंदाचा असतो; मात्र फटाक्यांच्या उत्साहाला जर नियमांची जोड नसेल तर हाच उत्सव क्षणार्धात दुर्घटनेत बदलू शकतो. हिंगोली शहरातील दाट लोकवस्तीतील फटाका साठवणुकीच्या ठिकाणी झालेली भीषण दुर्घटना याचे ताजे आणि हादरवून सोडणारे उदाहरण आहे. ५ ऑक्टोबरच्या रात्री हिंगोलीतील मारवाडी गल्ली परिसरातील घरात मोठ्या प्रमाणात फटाके साठवले होते. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. दोन जणांचा मृत्यू झाला, अनेक जण जखमी झाले आणि आग विझवण्यासाठी गेलेले अग्निशमन वाहनही आगीच्या विळख्यात सापडले. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने संबंधित फटाका गोदाम बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट केले. हिंगोलीची घटना घडल्यानंतर जालना जिल्हा प्रशासनाने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या फटाका विक्री परवान्यांची प्रक्रिया सुरू केली आहे. नवीन आणि नूतनीकरणाचे अर्ज ७ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान स्वीकारले जाणार आहेत. अर्जासोबत विविध कागदपत्रे, स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र, जागेची कागदपत्रे, अग्निसुरक्षेबाबतचे स्वयंघोषणापत्र आणि नवीन परवान्यासाठी पोलिसांचे चारित्र्य प्रमाणपत्र व नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कागदोपत्री प्रक्रिया महत्त्वाची आहे; पण खरी कसोटी कागदपत्रांच्या पलीकडे आहे जालन्यात प्रत्यक्ष फटाका विक्री आणि साठवणूक होत असलेल्या ठिकाणांची पाहणी झाली आहे का? हा प्रश्न आज विचारण्याची वेळ आली आहे. फटाका विक्रीचा तात्पुरता परवाना एका जागेसाठी मिळतो; मात्र प्रत्यक्ष व्यवसाय करताना फटाक्यांचा अतिरिक्त साठा दुसऱ्या ठिकाणी ठेवला जात नाही ना, याची तपासणी तितकीच महत्त्वाची आहे. विशेषतः दाट लोकवस्ती, अरुंद गल्ल्या, निवासी इमारती, बाजारपेठा, शाळा, रुग्णालये किंवा मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असलेल्या परिसरात फटाक्यांचा साठा असेल तर धोका अनेक पटींनी वाढतो. हिंगोलीतील दुर्घटनेने हाच धोका अधोरेखित केला आहे. त्यामुळे जालन्यात केवळ परवाना असलेल्या दुकानांची यादी तयार करून प्रशासनाचे काम संपत नाही. परवानाधारक दुकानात किती साठा आहे, तो कुठे ठेवला आहे, साठवणुकीची जागा नियमांनुसार आहे का आणि परवान्यात नमूद केलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र साठा तर नाही ना, याची प्रत्यक्ष पडताळणी आवश्यक आहे. प्रशासनाने फटाका विक्रीच्या ठिकाणी वाळूने भरलेल्या बादल्या, पुरेसे पाणी आणि फायर एक्स्टिंग्विशर उपलब्ध असल्याबाबत स्वयंघोषणापत्र मागितले आहे. मात्र प्रश्न असा आहे की, स्वयंघोषणापत्र दिल्यानंतर प्रशासन प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन या साधनांची उपलब्धता तपासणार आहे का? फायर एक्स्टिंग्विशर आहे, पण तो कार्यरत आहे का? पाण्याची व्यवस्था आहे, पण आपत्कालीन परिस्थितीत सहज उपलब्ध आहे का? वाळूची बादली ठेवली आहे, पण तिची संख्या आणि स्थान योग्य आहे का? दुकानात विद्युत वायरिंग सुरक्षित आहे का?ज्वलनशील वस्तूंच्या आसपास उष्णता निर्माण करणारी उपकरणे किंवा इतर धोकादायक सामग्री नाही ना? दुकानातून आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना बाहेर पडण्यासाठी पुरेसा मार्ग आहे का? या प्रश्नांची उत्तरे कागदावर नव्हे तर प्रत्यक्ष तपासणीत मिळायला हवीत. परवाना देणे ही प्रशासकीय प्रक्रिया आहे; सुरक्षितता सुनिश्चित करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. दिवाळीच्या काळात फटाक्यांची विक्री मोठ्या प्रमाणात वाढते. दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी होते. त्याच वेळी फटाक्यांचा साठाही वाढतो. अशा परिस्थितीत एक छोटी ठिणगी, शॉर्टसर्किट, निष्काळजीपणा किंवा नियमबाह्य साठवणूक मोठ्या दुर्घटनेचे कारण ठरू शकते. म्हणून जालना शहरात फटाका विक्री केंद्रांची संयुक्त अग्निसुरक्षा तपासणी मोहीम राबविण्याची गरज आहे. महसूल, पोलीस, महापालिका आणि अग्निशमन विभागाने संयुक्तपणे ही तपासणी केली तरच चित्र स्पष्ट होईल. फटाका विक्रीच्या दुकानांपेक्षा फटाक्यांची मोठ्या प्रमाणातील साठवणूक अधिक गंभीर विषय आहे. शहरातील निवासी भाग, घरांचे तळमजले, पत्र्याची शेड, गोदामे किंवा बाजारपेठेतील बंद खोल्यांमध्ये नियमबाह्य पद्धतीने फटाके साठवले जात नाहीत ना, याची विशेष तपासणी झाली पाहिजे. हिंगोलीच्या दुर्घटनेनंतर तेथील प्रशासनाने अशा साठवणुकीची घराघरांत शहानिशा करण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे. जालन्यातही अशीच जोखीम-आधारित तपासणी करण्याची आवश्यकता आहे. दरवर्षी दिवाळी आली की फटाका दुकानांची तपासणी, परवाने आणि अग्निसुरक्षेच्या सूचना दिल्या जातात. त्यानंतर काही दिवसांनी सर्व काही पूर्वपदावर येते, अशी स्थिती राहिली तर प्रशासनाच्या तपासणीचा उपयोग काय? फटाका विक्रीचा व्यवसाय सुरू होण्यापूर्वी तपासणी, विक्री सुरू असताना अचानक तपासणी आणि साठवणुकीवर स्वतंत्र नियंत्रणअशी तीन टप्प्यांची यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. विशेषतः 'परवाना आहे' म्हणजे 'कुठेही साठवणूक करता येईल' असा अर्थ होऊ नये. जालना शहर आणि जिल्ह्यात किती तात्पुरते फटाका विक्री परवाने देण्यात आले? त्यापैकी किती ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी झाली? किती ठिकाणी अग्निसुरक्षेच्या त्रुटी आढळल्या? किती ठिकाणी सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या? किती ठिकाणी परवाने नाकारले किंवा कारवाई केली? बेकायदेशीर साठवणूक आढळल्यास किती जणांवर कारवाई झाली? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजेदाट लोकवस्तीतील फटाका साठवणुकीची किती ठिकाणे प्रशासनाच्या रडारवर आहेत? या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळायला हवीत. आग लागल्यानंतर अग्निशमन दल धावून येईल, पोलीस बंदोबस्त करतील, रुग्णवाहिका पोहोचेल आणि पंचनामा होईल. पण त्या वेळेपर्यंत कदाचित खूप उशीर झालेला असेल. हिंगोलीच्या घटनेत अग्निशमन वाहनालाही आगीचा फटका बसल्याचे समोर आले आहे. म्हणूनच प्रशासनाने दुर्घटनेनंतरच्या प्रतिसादापेक्षा दुर्घटना होऊ नये यासाठीच्या प्रतिबंधात्मक यंत्रणेला प्राधान्य दिले पाहिजे. फटाका विक्रेत्यांची जबाबदारीही तितकीच आहे. नियम पाळून व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांचे संरक्षण झाले पाहिजे; पण नियम धाब्यावर बसवून अतिरिक्त साठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. दिवाळीचा आनंद अबाधित ठेवायचा असेल तर आजच तपासणी करा. उद्या दुर्घटना झाल्यानंतर 'चौकशी समिती' नेमून उपयोग नाही.

# सिनेसृष्टीतील तारा आणि सामाजिक परखड व्यक्तीमत्त्व काळाच्यापल्याड नाहिसा

नटसम्राट नाना पाटेकर यांच्या अकाली निधनाने एक उत्तम अभिनेता आणि सामाजिक भान असलेला लोकप्रिय कलाकार गमावल्याची भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. मराठी सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलेल्या नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वासह महाराष्ट्रावरही शोककळा पसरली आहे. नानांच्या रुपाने प्रतिभावंत कलाकारासह सामाजिक भान असलेले उमदे व्यक्तिमत्व हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कलाकार सामाजिक, राजकीय भूमिका घेत नसल्याचा आक्षेप वारंवार घेतला जातो. मात्र नाना पाटेकर हे नेहमीच याला अपवाद राहिले. नाना पाटेकर यांना गोव्यातील दोना पावला येथील घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर त्यांना उपचारासाठी तातडीने मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्यांना ४५ मिनिटे कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) अर्थात हृदय व फुफ्फुसांचे पुनरुज्जीवन देऊन त्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र उपचारांदरम्यान पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथे एका मराठी कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव विश्वनाथ पाटेकर आहे. हे नाव फार थोड्या लोकांना माहीत आहे. त्यांचे वडील गजानन पाटेकर व्यापारी होते, तर आई निर्मला पाटेकर गृहिणी होत्या. नाना पाटेकर यांना अशोक आणि दिलीप पाटेकर असे दोन भाऊ आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव नीलकंती पाटेकर असून त्या बँक अधिकारी होत्या. नाना पाटेकर यांना दोन मुले, मात्र त्यापैकी एका मुलाचे दुर्दैवाने निधन झाले, तर मल्हार नावाचा मुलगा आहे. चित्रपटसृष्टीमध्ये ते नाना पाटेकर या नावाने परिचित झाले होते. व्यक्तिमत्त्वातील जरब, जबरदस्त संवादफेक या बळावर त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

नाना पाटेकर यांनी मुंबईत राहून शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांची शाळा समर्थ विद्यालय होती. त्यानंतर त्यांनी वांद्रे स्कूल ऑफ आर्टमध्ये (आताचे एल.एस. रहेजा स्कूल ऑफ आर्ट) शिक्षण घेतले आणि सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पदवी घेतली आहे. चित्रपट क्षेत्रात नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये 'गमन' या सिनेमातून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या अभिनयाला तीन राष्ट्रीय पुरस्कार, दोन फिल्मफेअर पुरस्कार मिळाले असून २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. याशिवाय अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आणि सन्मान त्यांच्या नावावर आहेत. प्रहार चित्रपटाच्या तयारीसाठी तीन वर्षांच्या प्रशिक्षण कालावधीनंतर नाना यांना १९९० मध्ये भारतीय प्रादेशिक सैन्यात मानद कॅप्टन म्हणून नियुक्त करण्यात आले आणि त्यांनी जनरल व्ही.के. सिंग यांच्यासोबत काम केले, ज्यांच्याकडे त्यावेळी कर्नलची रँक होती आणि त्यांचा एक कॅमिओ होता. १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान, नाना पाटेकर यांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये मानद मेजर म्हणूनही सेवा दिली आहे.

नाना पाटेकर यांनी अभिनयासोबत सामाजिक क्षेत्रामध्येही आपल्या कार्याची छाप पाडली होती.

त्यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून शेतक-यांसाठी सामाजिक कार्य सुरु केले होते. समाजातील वंचित घटकांसाठी, प्रामुख्याने दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मोठे सामाजिक कार्य केले आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह त्यांनी नाम फाउंडेशन या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा (लातूर, उस्मानाबाद) परिसरातील दुष्काळ आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आर्थिक मदत केली. दुष्काळमुक्तीसाठी गावांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि जलसंधारणाची विविध कामे व बंधारे बांधण्याचे मोठे प्रकल्प नाम फाउंडेशनच्या माध्यमातून राबवले. शेतकरी कुटुंबातील गरीब मुलींच्या विवाहासाठी आर्थिक हातभार लावणे तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणे ही कामे केली.

बिहारमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी अनुभूती या संस्थेद्वारे निधी दिला. तसेच पाठशाला या चित्रपटाचे मानधन आणि राज कपूर पुरस्काराची १० लाख रुपयांची संपूर्ण रक्कम त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी दान केली. ते आपल्या मिळकतीचा मोठा वाटा सामाजिक कार्यासाठी व मदतीसाठी वापरत असत.

अशा या ज्येष्ठ अभिनेत्याच्या निधनाचे दुःखद वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले आहे. आपल्या दमदार अभिनयाने, आगळ्या संवादफेकीने आणि प्रत्येक भूमिकेतील विलक्षण सहजतेने त्यांनी रसिकांच्या मनावर कायमची अमिट छाप उमटवली. परिंदा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, वेलकम, पक पक पकाक, देऊळ, नटसम्राट अशा अनेक चित्रपटांमधून त्यांच्या अभिनयाचे विविध पैलू रसिकांना अनुभवायला मिळाले.

कलाकार म्हणून यशस्वी असतानाच सामाजिक प्रश्नांप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून केलेली कृतिशील समाजसेवा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तितकाच प्रेरणादायी पैलू होता. त्यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वाने एक संवेदनशील आणि प्रतिभावान कलाकार, तर समाजाने एक कृतिशील व सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या अभिनयाची, विचारांची आणि सामाजिक कार्याची अमिट छाप सदैव स्मरणात राहील.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

पान १ वरुन...

### मंठ्यात शेतकरी...

करण्यासाठी सरकारने ठोस निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी वाडेट्टीवार यांनी केली. शेतकऱ्यांना केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष मदत मिळाली पाहिजे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेस आक्रमक भूमिका घेणार असल्याचे सांगत विजय वाडेट्टीवार म्हणाले की, जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या मांडणार आहोत. जोपर्यंत शेतकऱ्यांना योग्य मदत मिळत नाही, तोपर्यंत आपण शांत बसणार नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेतही आवाज उठवून सरकारकडे मदतीची मागणी केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेतकऱ्यांनी संकटाच्या काळात खचून जाऊ नये, असे आवाहन करत वाडेट्टीवार यांनी ''रडू नका, लढण्यासाठी तयार राहा,'' असा संदेश दिला. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी काँग्रेस पक्ष त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विजय वाडेट्टीवार यांनी पुण्यातील एमपीएससी आंदोलनाच्या विषयाचाही उल्लेख केला. युवक, विद्यार्थी आणि शेतकरी यांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच शासनातील टेंडर प्रक्रियेबाबतही त्यांनी गंभीर आरोप केले. मंत्र्यांकडून टेंडर मंजुरीसाठी पैसे घेतले जात असल्याचा आरोप करत या प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. मंठा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विवेक घारे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या शेतकरी संवाद व दुष्काळ पाहणी दौऱ्याला तालुक्यातील शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन परिस्थिती जाणून घेणे आणि त्यांच्या अडचणी वरिष्ठ काँग्रेस नेत्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान, पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती, कर्जाचा वाढता भार आणि शेतीच्या उत्पादनावर झालेला परिणाम याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. या शेतकरी संवाद व दुष्काळ पाहणी दौऱ्याला मंठा काँग्रेस अध्यक्ष विवेक घारे, काँग्रेस विधिमंडळ नेते तथा आमदार विजय वाडेट्टीवार, माजी आमदार राजेश राठोड, जालना जिल्हा काँग्रेस अध्यक्ष कल्याण दळे, नीलकंठ वायाळ जिल्हा महासचिव,साजिद शेख नगरसेवक, सुरेश वाव्हळे, आसाराम चोरमारे, सारिका वरणकर (प्रदेश सचिव, ओबीसी), यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते.

### जालना ग्रामीण...

ठाकूर, जिल्हा सरचिटणीस गोविंद ढेंबरे, सुहास मुंडे, सत्यनारायण गिल्डा, संध्याताई देठे, देविदास कुचे, भगवान मात्रे, विजय राठोड, संपत टकले, प्रदीप पवार, भगवान बारगाजे, हरिचंद बाबा शिंदे, एकनाथ मोरे,सौरभ कुलकर्णी,शत्रघ्न कणसे,प्रदीप साबळे, नंदकिशोर पाटील, गणेश कोल्हे,विष्णु जाधव,कल्याण काळे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, बुथप्रमुख, शक्तीकेंद्रप्रमुख, -२ तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे भाजपा कार्यालय परिसरात उत्साह, राष्ट्रभक्ती आणि संघटनशक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. 'सेवा हीच साधना, राष्ट्रहित हेच ध्येय आणि विकसित भारत हीच दिशा या भावनेने सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. सेवा, सुशासन आणि विकासाच्या माध्यमातून विकसित भारताच्या संकल्पपूर्तीसाठी भाजपा कार्यकर्ते जनसेवेच्या माध्यमातून सातत्याने योगदान देत राहतील, असा संकल्प यावेळी करण्यात आला.

### सातबाऱ्यावरील...

खासगी कारमध्ये एसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून लाचेची रक्कम जप्त करण्यात आली.

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाणे, जालना येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे एसीबीने कळविले आहे.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. त्यांच्या पथकात पोलीस हवालदार गजानन घायवट, पोलीस अंमलदार मनोहर भुतेकर, संदीप लहाने, शिवलिंग खुळे, गणेश चेके आणि चालक पोलीस हवालदार बिनोरकर यांचा समावेश होता. कारवाईस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

कोणत्याही लोकसेवकाने शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीने केले आहे. लाच मागणीसंदर्भात तक्रार असल्यास जालना एसीबी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### कै. सौ. कमलताई...

कायदा यात १२ सहभागी, शुद्ध विज्ञान ( ) यात २२ सहभागी, कृषी आणि पशुसंवर्धन यात १५ सहभागी,

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान यात १० सहभागी, वैद्यकीय आणि औषधनिर्माणशास्त्र ०६ सहभागी विद्यार्थी होते. प्रा. डॉ. प्रदीप देशमुख यांनी परभणी जिल्हा आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन उत्कृष्ट करण्यात आले याबद्दल कौतुक केले आणि विजेत्या स्पर्धकांना पुढील विद्यापीठीय संशोधन स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या समारोपात सहभागी विद्यार्थ्यांमधून हर्षवर्धन मोरे याने आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओमप्रभा लोहकरे यांनी केले, बक्षीस वितरण वाचन प्रा. कांचन शर्मा तर आभार डॉ. संगीता लोमटे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपले योगदान दिले आणि आविष्कार : २०२६-२७ यशस्वीरित्या संपन्न केला.

### माणुसकीचा आधारवड...

मोफत बियाणे उपलब्ध करून देण्यात आले. विधवा महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि त्यांना रोजगाराचे साधन मिळावे, यासाठी मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. होतकरू आणि गरीब शेतकरी कुटुंबांना उत्पन्नाचे साधन मिळावे, यासाठी शेळ्या-मेंढ्यांचे वाटप करण्याचे कामही नाम फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आले. अनेक गावांमध्ये नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी आरओ प्लांट उभारून शुद्ध पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली.

निसर्गाचा कोप असो, दुर्घटना असो किंवा पूरपरिस्थितीजिथे संकट, तिथे नाम ही भावना घेऊन नाम फाउंडेशन धावून जायचे. माळीण दुर्घटनेपासून कोकणातील पूरपरिस्थितीपर्यंत मदतकार्य करताना आवश्यक मशिनरी आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले. पूरग्रस्त शेतकरी कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणासाठीही आर्थिक मदतीचा हात पुढे करण्यात आला.

वर्षभरात किमान तीन-चार वेळा नानांशी, मकरंदजींसह आमची भेट व्हायची. कामाच्या निमित्ताने भेट झाली की मनमोकळ्या गप्पा व्हायच्या. मात्र या गप्पांमध्येही नानांचा केंद्रबिंदू नेहमी शेतकरी आणि समाजातील गरजू माणूस असायचा. 'शेतकऱ्यांसाठी आणखी काय करता येईल?' हा त्यांचा प्रश्न आणि त्यामागची तळमळ आजही मनात घर करून आहे. नानांच्या घरच्या गणपतीच्या निमित्ताने दरवर्षी आम्हाला स्नेहपूर्वक निमंत्रण मिळायचे. संपूर्ण टीमला ते आपुलकीने घरी बोलवायचे, स्नेहभोजन करायचे आणि प्रत्येक कार्यकर्त्याला कुटुंबातील सदस्याप्रमाणे जीव लावायचे. जालना जिल्ह्यातून नामचे अनेक सेवक आणि शेतकरी दरवर्षी पुण्यात त्यांच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहायचे. नानांचे विचार ऐकणे आणि त्यांच्या सहवासात राहणे ही आमच्यासाठी एक प्रेरणादायी पर्वणी असायची.

नाना पाटेकर हे केवळ पडद्यावरचे मोठे कलाकार नव्हते; ते समाजाच्या वेदना जाणणारे आणि त्या वेदनांवर प्रत्यक्ष काम करणारे संवेदनशील माणूस होते. त्यांनी आम्हाला केवळ समाजसेवेचा मार्ग दाखवला नाही, तर माणसासाठी उभे राहण्याची संस्कृती दिली. आज नाना आपल्यात नसले तरी त्यांनी दाखवून दिलेली दिशा, शेतकरी आणि वंचित घटकांविषयीची त्यांची तळमळ आणि समाजाप्रती असलेला आदर यापुढील काळातही कायम प्रेरणा देत राहील. मल्हारजी पाटेकर आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून नानांनी उभा केलेला सेवाविचार पुढे नेण्यासाठी आम्ही जालना जिल्ह्यातील नामसेवक म्हणून कटिबद्ध आहोत. नानांनी आयुष्यभर जपलेली माणुसकी, त्यांनी उभे केलेले सेवाकार्य आणि त्यांनी जोडलेली माणसांची नाती हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. त्यांच्या स्मृती जपत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविणे, हीच नानांना खरी श्रद्धांजली ठरेल. नाना, तुम्ही आम्हाला पोरके केलेत; पण तुम्ही दाखवून दिलेली माणुसकीची वाट आम्ही कधीही सोडणार नाही. भावपूर्ण श्रद्धांजली!

### दुष्काळ निवारणासाठी....

पाणी, धरणांतील जलसाठा, जलस्रोतांचे बळकटीकरण, टँकर व्यवस्थापन आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी सर्वंकष मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करून सादर करावी. पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील ९५४ गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असून, सुमारे ६ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्र पंचनाम्याच्या कक्षेत आहे. आतापर्यंत सुमारे ६० टक्के गावांमध्ये पंचनामे पूर्ण झाले असून, क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ५३ टक्के आणि खातेदारांच्या दृष्टीने सुमारे ६१ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. जालना जिल्ह्यात सुमारे ५ लाख ८१ हजार खातेदार असून, त्यापैकी ३ लाख ५६ हजार खातेदारांचे पंचनामे झाले आहेत. आठवडाभरात पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे पाठविण्याचे आणि दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवावे.

पंचनामे तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्या संयुक्त समितीमार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मागील वर्षीच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर यंदा पंचनाम्यांमध्ये पारदर्शकता आणि वस्तुनिष्ठता राखण्यावर भर देण्यात येत आहे. पीकविम्याबाबतही प्रशासनाला विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्ह्यात सुमारे दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी पीकविमा काढला असून सोयाबीनसाठी प्रस्तावित ३१२ प्रयोगांपैकी ९५ प्रयोग पूर्ण झाले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जिल्ह्यातील प्रमुख, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये पाणीसाठा अत्यल्प असून त्याचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. ''टँकर जिथे उभा राहतो, तिथे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. त्यामुळे टँकर भरण्याचे आणि वितरणाचे ठिकाण जीपीएसद्वारे निश्चित करा. ज्या ठिकाणी टँकरमधून पाणी दिले जाते, तिथे जलपुनर्भरणाची व्यवस्था करून पाण्याचा एक थेंबही वाया जाणार नाही, याची दक्षता घ्या,'' असे निर्देश पंकजा मुंडे यांनी दिले. परवानगीशिवाय बोअरवेल घेण्यास कडक निर्बंध घालावेत. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी भरण्याच्या ठिकाणापासून वितरणापर्यंत त्याचे संनियंत्रण करावे. टँकर उभा राहणाऱ्या ठिकाणी जलतारा किंवा शोषखड्डा तयार करून सांडणारे पाणी भूजल पुनर्भरणासाठी वापरावे. जवळील विहीर अथवा हातपंपाच्या पुनर्भरणाचीही व्यवस्था करावी, असे निर्देश पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी दिले. पाणी वापरात दहा टक्के कपातीच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी. बांधकामे, क्रशर, रस्ते आणि महामार्गांच्या कामांसाठी पिण्यायोग्य किंवा शुद्ध पाणी वापरले जाणार नाही, यासाठी आवश्यक नियंत्रण ठेवावे. उद्योगांनी शक्य तेथे प्रक्रिया केलेल्या किंवा पुनर्वापरयोग्य पाण्याचा वापर करावा. खासगी बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर नियंत्रित करण्याबाबत शासनस्तरावरील धोरणात्मक निर्णयासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.प्रत्येक तालुक्यात सुरू केलेल्या चारा साक्षरता अभियानातून मुरघास, हायड्रोपोनिक्स, अझोला आणि चाऱ्याच्या योग्य वापराची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना द्यावीत. गाळपेर क्षेत्राचा चारा उत्पादनासाठी उपयोग करावा. आवश्यकता भासल्यास गावपातळीवर चारा डेपो सुरू करून टॅग केलेल्या जनावरांच्या संख्येनुसार चारा आणि पाण्याचे नियोजन करावे, असे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी निर्देशित केले. दुष्काळाच्या काळात रोजगार उपलब्ध करून देतानाच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतील कामांचा जलसंधारणाशी संबंध जोडण्याच्या सूचना पालकमंत्री मुंडे यांनी देण्यात आल्या. नदी-नाल्यांचे खोलीकरण, पुनर्जीवन, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि गाळ काढण्याच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश पंकजा मुंडे यांनी दिले. ''पुढील पावसाळ्यातही दुष्काळाची शक्यता गृहीत धरून आत्तापासूनच नियोजन करा. येणारा प्रत्येक पाण्याचा थेंब अडवला आणि जिरवला पाहिजे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

दुर्लक्षित व गाळाने भरलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करून त्यांची स्वच्छता व पुनर्बांधणी करण्याचेही त्यांनी यावेळी दिले. नैसर्गिक तसेच कृत्रिम तलावांचेही ऑडिट करून आगामी काळातील जलसाठ्यासाठी आवश्यक कामांचे नियोजन करण्यासही त्यांनी सांगितले. नगरपालिकांच्या पाणीपुरवठ्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला.

# ‘नटसम्राट’ ते शेतकऱ्यांचा कैवारी नाना...








‘‘नाना पाटेकर‘‘ चित्रपट सृष्टीतील एक नावाजलेले मराठी नाव. दिलखुलास व्यक्तीमत्व.नानांनी आतापर्यंत अनेक चित्रपट केली. बहुतांश चित्रपटात नानांनी मुख्य अभिनेता म्हणूनच भुमिका केल्या. सहाय्यक अभिनेता, खलनायकी काही भूमिका केल्यात.नाना पाटेकरांचा जन्म १ जानेवारी १९५१ चा.मुरुड जंजिरा ईथला.काही काळ शिक्षणासाठी ते मुंबईतही होते. जे.जे.आर्टचे ते विद्यार्थी आहेत. नाना पाटेकर यांची चित्रपट कारकीर्द साधारणतः ऐंशी च्या दशकात सुरु झाली.थिएटर करत असताना ते निलकांती यांच्या प्रेमात पडले. त्या बँकेत अधिकारी होत्या. त्यांना पंचवीसशे रुपये पगार होता तर नानांना एका शो चे पन्नास रुपये मिळात होते. त्यावेळी त्यांचा संसार आनंदाचा होता आणि मिळणारे पैसे त्यांच्यासाठी भरपूर होते. त्यांच्या लग्नाला केवळ ७५० रुपये खर्च आला हे सुद्धा वाचण्यात आले आहे. सध्या दोघांमध्ये संवाद असून ते वेगळे राहत आहेत, अशी माहिती आहे. नानांचा मुलगा मल्हार याचे स्वतःचे प्रोडक्शन हाऊस असून त्याला नानांचेच नाव दिले आहे.

नाना पाटेकर यांचा ‘‘गमन‘‘ हा पहिला चित्रपट. सिंहासन या चित्रपटातून त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. माफीचा साक्षीदार हा मराठी चित्रपट केला. पहिले नाटक विजया मेहता यांनी दिग्दर्शित केले. मराठी चित्रपट हिंदी चित्रपट आणि नाटक क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला.दबदबा कायम राखला.वडिलांना नाटकाची तमाशा बघायला आवडत. वडील हनुमान थिएटरमध्ये तमाशाला घेवून जात.त्यातूनच अभिनयाची आवड निर्माण झाली.असे नाना आपल्या मुलाखतीतून सांगतात.

गमन मधली भूमिका अतिशय छोटी होती त्यामुळे ती प्रेक्षकांच्या नजरेत आली नाही त्यानंतर भालू, शीला, अशा दुय्यम चित्रपटात त्यांनी काम केले. सलाम बॉम्बे, परिंदा, प्रहार,प्रतिघात, अंगार, तिरंगा क्रांतिवीर, हम दोनो, अग्निसाक्षी, खामोशी, गुलाम-ए-मुस्तफा,वजूद, युगपुरुष, कोहराम, टॅक्सी नंबर ९२११, वेलकम, अब तक छप्पन, वेलकम बॅक, यशवंत, अशा अनेक हिंदी चित्रपटात भूमिका केल्यात. पुढील काही काळात त्यांचा जर्नी नावाचा चित्रपट येत आहे.

सिंहासन, सावित्री, भालू राघू मैना, माफीचा साक्षीदार आपला माणूस, देऊळ, पक पक पकाक, प्रकाश बाबा आमटे, नट सम्राट, आता नुकताच येतोय ओले आले, अशा मराठी चित्रपटात नानाच्या भूमिका आहेत. महासागर,पाहिजे जातीचे, हमीदाबाईची कोठी, पुरुष,ह्या नाटकात भूमिका केल्यात.सोळा वर्षे त्यांनी‘‘पुरुष‘‘ चे १८६० प्रयोग केलेत.



**✻ भावपूर्ण श्रध्दांजली ✻**

नाना पाटेकर यांचे चित्रपट,नाटक बघणे हा वेगळाच अनुभव असतो. त्याचे संवाद प्रेक्षकांना भिडतात. काही काळ का होईना प्रेक्षक त्या चित्रपटाचा भाग बनतात. त्याना नाना आपला अभिनेता वाटतो.

१९८६ एन.चंद्रा यांच्या ‘‘अंकुश‘‘ या चित्रपटात नानांनी बेरोजगार असलेल्या एका युवकाची भूमिका केली होती ही भूमिका अविस्मरण ठरली.

२०१३मध्ये ‘‘पद्मश्री‘‘ देवून सरकारने त्यांचा सन्मान केला.

१९९०- परिंदा,१९९२ अंगार,१९९५- क्रांतिवीर,२००६- अपहरण चित्रपटासाठी फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले.तर

परिंदा, क्रांतिवीर ,साक्षी, चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाले.जोशी-अभ्यंकर हत्याकांडावर आधारित माफीचा साक्षीदार या चित्रपटात जक्कल ची भूमिका त्यांनी केली परंतु ती करायला नको होती असे त्यांना आता वाटत आहे. तसेच ज्या चित्रपटातील भूमिका त्यांना आवडल्या नाहीत,संवाद आवडले नाही त्या त्यांनी नाकारल्या.त्यात तडजोड केली नाही. नानांना गुन्हेगाराचे किंवा गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे चित्रपट आवडत नाही असे मत व्यक्त करतात.

नानांचा ‘‘वँक्सिन वार‘‘ हा चित्रपट आला. एका माध्यमाने दिलेला ‘‘इंडिया कान्ट डू इट‘‘ हा शेरा ‘‘इंडिया कॅन डू इट‘‘ मध्ये यशस्वी करण्यासाठी एका छोट्याशा बाटलीतील या लसीच्या निर्मिती मागचा मोठा संघर्ष या चित्रपटात दाखवला आहे.नानांची यातील भूमिका प्रभावी आहे.

आपल्या चित्रपटाच्या कारकिर्दीत माधुरी दिक्षित बरोबरचा ‘‘वजूद‘‘ हा चित्रपट त्यांना आवडला. परंतु तो फारसा चालला नाही ही खंत ते व्यक्त करतात.

कैसे बताऊ मै तुम्हे, मेरे लिए तुम कौन हो, कैसे बताऊ कैसे बताऊ मै.. तुम धडकनो का गीत हो, जीवन का तुम संगीत हो..
तुम जिंदगी.. तुम बंदगी.. तुम रोशनी.. तुम ताजगी
तुम हर खुशी.. तुम प्यार हो, तुम प्रीत हो, मनमीत हो
आँखो मे तुम, यादो मे तुम, सासो मे तुम, आहो मे तुम
निंदो मे तुम, ख्वाबोमे तुम..
तुम हो मेरी हर बात में, तुम हो मेरे दिन रात मे,
तुम सुबह मे, तुम शाम मे, तुम सोच मे, तुम काम में
मेरे लिए पाना भी तुम, मेरे लिए खोना भी तुम
मेरे लिये हसना भी तुम, मेरे लिये रोना भी तुम
और जागना.. सोना भी तुम
जाऊ कही देखू कही तुम हो वहां तुम हो वही
कैसे बताऊ मै......

ही वजूद मधील कविता रुपी संवाद अजूनही तो तस्साच म्हणतात..भावनिक होउन.रसिक प्रेक्षक अगदी मन लावून ऐकतात.नाना ही भावूक होतात... बस आता उरल्या आठवणी म्हणतात..

आपल्या आतापर्यंतच्या आयुष्यात ज्या ज्या घटना घडल्या ज्यांनी आपल्याला सहकार्य केल त्यांच्याबद्दल नाना नेहमीच मोकळेपणाने बोलतात आणि त्यांचे ऋण मान्य करतात. यालाही मन मोठे लागते. आपल्या मुलाखतीतून या गोष्टी ते नेहमीच सांगत असतात.

चित्रपट सृष्टीत येण्याच्या श्रेय अभिनेत्री स्मिता पाटील यांना देतात. स्मिता पाटील यांच्यामुळेच मी हिंदी चित्रपटात आलो असेही ते म्हणतात. चित्रपटात काम करावे किंवा करिअर करावे म्हणून पत्नी निलकांती आपल्या पाठीशी होती. तिनेच प्रोत्साहन दिले. पाठिंबा दिला पैशाची अजिबात चिंता करू नकोस. अभिनय तुझा श्वास आहे तेव्हा तेच कर असे ती मला म्हणाली असे त्यांनी आपल्या एका मुलाखतीत सांगितले आहे. आणि तिच्या या खंबीर पाठींब्या मुळेच मी येथे आहे असेही ते म्हणाले.

आपल्या आर्थिक अडचणीचे काळात ज्यांनी ज्यांनी आपल्याला मदत केली आहे त्यांचे ऋण ते व्यक्त करतात. सुरुवातीच्या काळात ‘‘हमिदाबाईची कोठी नाटक करत असताना त्यांच्यासोबत अशोक सराफ होते त्यावेळी अशोक सरांफाना साडेसातशे रुपये मानधन मिळायचे आणि नानांना फक्त पन्नास रुपये मानधन मिळायचे. त्यांच्या परिस्थितीची जाणीव अशोक सरांफाना असल्यामुळे ते नकळतपणे मदत करत असत. ज्यावेळेला ते रमी खेळत त्यावेळेला अशोक सराफ मुद्दाम खेळात हरत होते आणि त्यातून नाना जिंकत होते. पैसे मिळत होते, ही जाणीव नाना पाटेकर यांना होती परंतु परिस्थितीमुळे ती त्यांनी स्वीकारली होती. तसेच नाटकाचा प्रयोग झाल्यानंतर सुद्धा नाना सांगतात की मी अशोकचे डोके दाबून देत होतो, पाय दाबून देत होतो. त्याचे अशोक सराफ पाच रुपये द्यायचे तसेच विक्रम गोखले नानां ना काही प्रयोगांमध्ये काम देऊन नकळत मदत करत होते. याचा उल्लेख नाना करतात. आणि मोकळेपणाने त्याबद्दल सांगतात.

नाना पाटेकर यांचे भाषण किंवा मुलाखती खरोखरच प्रेरणादायी असतात ते बोलत असताना जणूकाही आपल्या मनातलेच भाव व्यक्त करत आहेत असे वाटते. ते जे मत मांडतात ते स्पष्ट शब्दात मांडतात. आणि प्रेक्षकांनाही नेहमी करता ते सांगत असतात की तुम्ही व्यक्त व्हा.बोलत जा. आपण व्यक्त होण्याचे विसरलो आहे असे ते म्हणतात.

राजकारणाविषयी भाष्य करताना ते लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असतानाची गोष्ट सांगतात. मित्राने त्यांच्याकडे दोनशे रुपयाची मागणी केली असताना माझ्याकडे तेवढे पैसे शिल्लक नाही त्यामुळे मदत करू शकत नाही असे सांगितल्यानंतर त्यांच्या पत्नीने दोनशे रुपये काढून दिले परंतु त्यानंतर शास्त्रींनी पत्नीला विचारले की तुझ्याकडे दोनशे रुपये कसे आले ? तेव्हा त्यांनी सांगितले तुम्ही मला दर महिन्याला जे काही देत होते त्यातून पाच-पन्नास रुपये शिल्लक ठेवून ते जमले होते. पण नंतर शास्त्रींने कळविले यापुढे आपला पगार दहा रुपयांनी कमी करावा . यशवंतराव चव्हाण गेले तेव्हा त्यांच्या खात्यात पंचवीस हजार रुपये होते.. आज आपण बघतो आपल्या बाजूला बसलेला नगरसेवक झाला की दुसऱ्या वर्षी तो मालामाल होतो. कसा होतो ? त्याची चौकशी व्हायला नको का ?हे आम्हाला कळते पण तुम्हाला कळत नाही का? असा प्रश्न व्यवस्थेला विचारतात. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगवास भोगून आलेली मंडळी मंत्री होतात यावर काहीतरी व्हायला हवे असे स्पष्ट मत नाना व्यक्त करतात. राजकारणात बोलताना शिवराळ भाषा वापरली जात आहे. गलिच्छ मध्ये गलिच्छ शब्द वापरले जातात, त्याला काही मर्यादा आहे का नाही? ही आपली संस्कृती आहे का? हे आपले संस्कार आहे का? अशाने आपण शाळा कॉलेज मधील मुले युवकांना काय आदर्श दाखवणार आहोत.? नानांनी सांगितलेली गोष्ट आपल्याला खूप काही सांगून जाते .

आजच्या परिस्थितीत जर बघितले तर लाखो लोक पेन्शन साठी लढा देत आहे त्यांना तुटपुंजे पेन्शन मिळते त्यात वाढ तर होत नाही पण आपली नेते मंडळी त्यांच्या दरमाहाचे पगारात पेन्शनमध्ये आपण होऊनच वाढ करून घेत असतात.

आपण आपले आयुष्य रोज जगत असतो आपापल्या परिने. त्यात आपले सुख शोधत असतो. पणजाता जाता कोणासाठी तरी जगणं यातून जो मनस्वी, मनमुराद आनंद मिळतो त्यातील गंमत काही वेगळीच असते. त्यांना आनंद देत असताना आपल्यालाही आनंद मिळत असतो. एक उत्कृष्ट अभिनेता असतानाच नाना हे समाजभान असणारा ‘‘माणूस‘‘ आहे.आपण समाजाचे काही देणे लागतो, आपल्याला पारितोषिक म्हणून मिळालेले दहा लाख रुपये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या साठी दिले. २०१५ साली नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी ‘‘नाम‘‘ नावाची संस्था स्थापन केले त्याद्वारे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत केली अनेक ठिकाणी जसे मराठवाडा विदर्भ पश्चिम महाराष्ट्र आत्महत्याग्रस्त गावांना प्रत्यक्ष जाऊन कुटुंबाची भेट घेऊन त्यांना मदतीचा हात दिला. त्यानंतर अनेक लोक,संस्था त्यांच्याशी जोडले गेले आणि नाम या संस्थेचे कार्य वाढत गेले वाढत आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, या ठिकाणी नाम या संस्थेची कार्यालय आहेत. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी मदत करण्याची त्यांची भूमिका आहे. आपल्या नटसम्राट चित्रपटाचे बहुतांशी मानधन त्यांनी नाम या संस्थेत जमा केल्याचे वाचले असेल.आपण शेतकऱ्याला मदत करतो याचा अर्थ त्यांच्यावर उपकार करतो असा नाही तर ती आपली जबाबदारीच आहे असे समजून मदत करा.असे विचार ते व्यक्त करतात. मॉलमध्ये खरेदी करताना आपण विचार करत नाही, परंतु शेतकऱ्यांचा माल खरेदी करताना भावाची घासाघीस करतो.नका करु असे.नका करु ..मिळू द्या दोन पैसे जास्त त्यांना. त्यांच्या बोलण्यात शेतकऱ्यां विषयी प्रेम. आत्मियता दिसत असे.. नाना भावना प्रधान होते. आईच्या आठवणीत त्याचे डोळे पाणावत..अतिशय साधी राहाणी असलेले नाना मुंबई सोडून आता आपल्या पुण्याच्या निसर्ग रम्य अशा शेतावर, फार्म हाऊस ला राहात होते. शेतीही करत .चित्रपट सोडला नाही मागील वर्षी त्यांचा ‘‘ओले आले‘‘....मराठी चित्रपट प्रदर्शित झाला. नटसम्राट,शेतकऱ्यांचा कैवारी सामाजिक भान जपणारा मोठा माणूस बोलत बोलता निघून गेला. नाना तू सदैव स्मरणात राहशील.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा..८९९९५६६९१७**

# नाभिक समाजाच्या हेअर सलून व्यवसायाला दरफलकाचे कवच द्या!

## सलून व्यवसायासाठी सेवांचे एकसमान व व्यवहार्य दर निश्चित करण्याची मागणी; दरफलकामुळे ग्राहकांचा विश्वास वाढणार

**जालना - प्रतिनिधी**

नाभिक समाजाचा पारंपरिक व्यवसाय आज आधुनिक हेअर सलूनच्या रूपाने मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. काळानुसार व्यवसायाचे स्वरूप बदलले असून, हेअर कटिंग, शेव्हिंग, हेअर स्टाईल, फेशियल, हेअर कलर यांसह विविध प्रकारच्या सेवा ग्राहकांना दिल्या जात आहेत. मात्र, या सेवांचे दर प्रत्येक सलूनमध्ये वेगवेगळे असल्याने ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, व्यावसायिकांमध्येही दराबाबत असमानता दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका पातळीवर आणि ग्रामीण भागातील नाभिक समाजाच्या हेअर सलून व्यवसायासाठी प्रशासनाने नाभिक समाजाच्या प्रतिनिधींशी चर्चा करून विविध सेवांचे योग्य, व्यवहार्य व सर्वमान्य दर निश्चित करावेत आणि प्रत्येक सलूनमध्ये अधिकृत दरफलक लावणे बंधनकारक करावे, अशी जोरदार मागणी नाभिक समाजातून होत आहे. दरफलकामुळे ग्राहकांना सेवा घेण्यापूर्वी निश्चित



शुल्काची माहिती मिळेल. त्यामुळे गैरसमज, वादविवाद आणि दराबाबतच्या तक्रारींना आळा बसून ग्राहक आणि व्यावसायिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक मजबूत होईल. दर स्पष्ट असेल तर व्यवहार पारदर्शक राहील आणि ग्राहकांचा विश्वासही कायम राहील, अशी भूमिका नाभिक समाजातील व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. महागाईच्या काळात व्यावसायिकांनाही न्याय मिळणे गरजेचे सलून व्यवसाय चालविताना दुकानाचे भाडे, वीजबिल, पाणी, आधुनिक मशिनरी, विविध कॉस्मेटिक साहित्य, स्वच्छता साहित्य तसेच कर्मचाऱ्यांचा पगार यासाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे केवळ ग्राहकांच्या सोयीचा विचार न करता नाभिक व्यावसायिकांच्या वाढत्या खर्चाचाही योग्य विचार करून दर निश्चित करणे आवश्यक आहे, अशी मागणी होत आहे. दर निश्चित करताना शहर, गाव, दुकानाचा आकार किंवा सुविधा यांचा विचार करून व्यवहार्य दररचना करता येऊ शकते.

## गणेशोत्सवात संयम दाखवणाऱ्या डीजे व्यावसायिकांना आता रोजगाराची आस!

# ‘आवाजाची मर्यादा ठरवा; पण उपजीविकेची दारे बंद करू नका’

### दोन दिवसांपूर्वी निवेदन देऊनही निर्णय नाही; पोलीस अधीक्षक तेगबीर संधू यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करावा

**जालना - प्रतिनिधी**

जालना ध्वनीप्रदूषणाचे नियम, न्यायालयीन निर्देश आणि प्रशासनाने निश्चित केलेल्या डेसीबल मर्यादांचे पालन करण्याची तयारी दर्शवूनही जालन्यातील डीजे मालक-चालकांच्या मागणीवर अद्याप पोलिस प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. दोन दिवसांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर साऊंड लाईट संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन कायदेशीर चौकटीत साऊंड सिस्टीमला परवानगी देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप निर्णय न झाल्याने डीजे व्यवसायिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

दरम्यान, गणेशोत्सवादरम्यान जालना पोलिस प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जालन्यातील डीजे मालक-चालकांनी रस्त्यावर डीजे आणला नाही. राज्यातील अनेक शहरांमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये डीजेचा आवाज ऐकू येत असताना जालन्यातील व्यावसायिकांनी प्रशासनाच्या भूमिकेला सहकार्य केले. त्यामुळे त्यांच्या या संयमाची प्रशासनाने दखल घेऊन आता त्यांच्या उपजीविकेच्या साधनाबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

डीजे, साऊंड सिस्टीम, लाईटिंग, जनरेटर आदी व्यवसायावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. या व्यवसायात केवळ डीजे मालक किंवा चालकच नव्हे, तर तंत्रज्ञ, कामगार, वाहनचालक, सेटअप करणारे कर्मचारी आणि इतर अनेक घटक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जोडलेले आहेत. व्यावसायिकांनी लाखो रुपयांची गुंतवणूक करून साऊंड सिस्टीम, स्पीकर्स, ॲम्प्लिफायर, लाईटिंग साहित्य, जनरेटर आणि वाहतूक साधने उभी केली आहेत. अनेकांनी या गुंतवणुकीसाठी कर्ज घेतले असून, त्याचे हप्ते नियमितपणे भरावे लागत आहेत.

व्यवसायावर दीर्घकाळ निर्बंध राहिल्यास या गुंतवणुकीचा परतावा तर दूरच, कर्जाचे हप्ते आणि कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागवणेही अडचणीचे होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे ‘डीजे बंद की सुरू’ असा एकतर्फी प्रश्न न ठेवता, न्यायालयीन निर्देश आणि ध्वनीप्रदूषणाच्या नियमांच्या चौकटीत कोणत्या अटींवर डीजेला परवानगी देता येईल, याचा प्रशासनाने विचार करावा, अशी मागणी होत आहे.

गणेशोत्सवात प्रशासनाला सहकार्य; आता व्यवसायाचा विचार करण्याची अपेक्षा

गणेशोत्सवाच्या काळात पोलिस प्रशासनाने ध्वनीप्रदूषणाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला जालन्यातील डीजे मालक-चालकांनी प्रतिसाद दिला आणि डीजे रस्त्यावर न आणता प्रशासनाला सहकार्य केले. उत्सवाच्या काळात अनेक ठिकाणी कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या या व्यावसायिकांचा किमान सकारात्मक दृष्टिकोनातून विचार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सहकार्य केलं म्हणून सन्मान केला जात असतो येथे सन्मानाचा विषय बाजूला ठेवला तरी त्यांच्या उपजीविकेचे साधन असलेल्या व्यवसायाला कायदेशीर चौकटीत जगण्याची संधी मिळणे आवश्यक आहे, .

डीजे मालक-चालकांकडून ध्वनीप्रदूषणाचे नियम मोडण्याची मागणी केली जात नसून, उलट न्यायालयीन निर्देश आणि प्रशासनाने घालून दिलेल्या डेसीबल मर्यादा, वेळेची बंधने तसेच इतर अटींचे पालन करून व्यवसाय करण्याची संधी द्यावी, अशी मागणी करत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यास व्यावसायिकांचा विरोध नसल्याचेही संघटनेने स्पष्ट केले आहे. मात्र, काही जण नियमांचे उल्लंघन करतात म्हणून नियमांचे पालन करण्यास तयार असलेल्या सर्व व्यावसायिकांवर एकसारखी कारवाई किंवा सरसकट बंदीची भूमिका घेऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




**दुष्काळी परिस्थितीत रोजगाराचा प्रश्न गंभीर**

यंदा जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दुष्काळी परिस्थितीचा परिणाम जाणवत आहे. अशा काळात अनेक कुटुंबांसमोर रोजगार आणि उत्पन्नाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

डीजे-साऊंड व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांची परिस्थितीही यापासून वेगळी नाही. व्यवसाय पूर्णपणे ठप्प राहिल्यास त्याचा परिणाम केवळ डीजे मालकावर होत नाही, तर त्याच्याशी जोडलेल्या कामगार आणि इतर सेवा पुरवठादारांवरही होतो. त्यामुळे सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून प्रशासनाने ‘नियमांचे पालन करून व्यवसाय’ या मार्गाचा विचार करावा, अशी मागणी पुढे आली आहे.

**पोलीस अधीक्षक तेगबीर संधूंकडून सहानुभूतीपूर्वक विचाराची अपेक्षा**

जालना जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था आणि ध्वनीप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी करताना पोलीस प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे. पोलीस अधीक्षक तेगबीर संधू यांनी डीजे मालक-चालकांची बाजूही सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतली आहे. आता पोलीस अधीक्षक यांनी न्यायालयीन निर्देश, कायदे व प्रशासनाच्या अटींच्या चौकटीत परवानगी देता येते का, याचा विचार करावा, अशी मागणी व्यावसायिकांकडून होत आहे.

नियम मोडण्याची परवानगी नव्हे, तर नियम पाळून व्यवसाय करण्याची संधी द्या, हा डीजे व्यावसायिकांचा मुख्य मुद्दा आहे. त्यामुळे प्रशासन आणि व्यावसायिक यांच्यात संवाद साधून व्यवहार्य मार्ग काढण्याची गरज निर्माण झाली आहे. ‘आवाजाची मर्यादा ठरवा; पण उपजीविकेची दारे बंद करू नका’, अशी भूमिका घेत डीजे मालक-चालकांनी प्रशासनाकडे पुन्हा एकदा परवानगीची मागणी केली आहे.

### दांडियासाठी लाइट्स साउंडला परवानगी आहे का? की ढोल ताशांच्या गजरात दांडिया खेळायला जाणार

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात विविध ठिकाणी दांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. दांडिया खेळताना संगीत आणि साउंड सिस्टीमला विशेष महत्त्व असताना या कार्यक्रमांसाठी वापरण्यात येणाऱ्या साउंड सिस्टीमला पोलिस प्रशासनाकडून परवानगी दिली जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे ध्वनीप्रदूषणाचे नियम, डेसीबल मर्यादा आणि न्यायालयीन निर्देशांचे पालन करण्याची तयारी डीजे व्यावसायिकांनी दर्शविली आहे. त्यामुळे दांडिया कार्यक्रमांमध्ये साउंड सिस्टीमला अटी-शर्तींसह परवानगी दिली जात असेल, तर त्याच नियमांच्या चौकटीत डीजे व्यावसायिकांनाही व्यवसायासाठी परवानगी द्यावी. जर डीजे साऊंड सिस्टिम लाइट्स यांना परवानगी न मिळाल्यास यंदा दांडिया ढोल-ताशांच्या गजरातच खेळवावा लागणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे प्रशासनाने सर्वांसाठी नियम समान ठेवून स्पष्ट भूमिका जाहीर करावी.

---

## एकात्मिक बाल विकास प्रकल्प खेड फुरूस बीट अंतर्गत पोषण महा सेवा संकल्प अभियान, २०२६ मोठ्या उत्साहात साजरा

**जालना - प्रतिनिधी**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प खेड  फूरुस बीट अंतर्गत दस्तुरी सह्याद्री हायस्कूल मध्ये पोषण महा तसेच सेवा संकल्प अभियान, २०२६ हा कार्यक्रम नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमासाठी मा. महिला व बालकल्याण सभापती सौ. मयुरी शिर्के, त्याचप्रमाणे जिल्हा परिषद सदस्य श्री.अजय बिरवटकर, पंचायत समिती सदस्य श्री. संग्राम कदम, सौ. अपूर्वा जाधव, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी सौ. दीपाली शिरीषकर, पर्यवेक्षिका देवता काटकर, दस्तुरी सह्याद्री हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रदीप घाणेकर सर तसेच बहुसंख्येने पालक विद्यार्थी हजर होते.  सेवा निवृत्त कनिष्ट सहकारी सौ. सुप्रिया सावंत यांचा सत्कार करण्यात आला. सेवा निवृत्त पर्यवेक्षिका शोभा सावंत या ही उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमात विविध पाककृती मांडण्यात आल्या होत्या,




तसेच विविध योजनांचे स्टॉल्स ठेवण्यात आले होते, त्याचप्रमाणे भव्य रांगोळ्या मधून विविध योजना मांडण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेमधून विविध पोषणाबाबत चित्रे साकारण्यात आली होती, फळसजावट,  च्या विविध पाककृती मांडण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाचे विशेष म्हणजे पोषण परीने सर्वाचे लक्ष वेधले. सदर कार्यक्रमात सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध योजनांचे प्रत्यक्ष लाभ देऊन आशिर्वादाचे दिवे लावण्यात आले. प्रारंभ फाऊंडेशनच्या शिल्पा शिंदे उपस्थित होत्या. या फाऊंडेशन टीम एच आर रेसीपी साठी बक्षीसे देण्यात आली. सर्वांनी कामात योगदान दिले. अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी कार्यक्रम  यशस्वी होण्यासाठी खूप मोलाचे सहकार्य केले.

## जनगणनेचे कर्तव्य बजावणाऱ्या शिक्षकांच्या अर्जित रजेचा प्रश्न ऐरणीवर; शासनाला स्मरणपत्र सादर

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये राष्ट्रीय जनगणनेचे काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या हक्काची ‘अर्जित रजा’ (बदली रजा) देण्याबाबत स्पष्ट शासन निर्णय असूनही, प्रशासकीय स्तरावर याबाबत टाळाटाळ केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि जनगणना संचालकांना स्मरणपत्र पाठवून यावर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २९ ऑक्टोबर २०१० च्या परिपत्रकानुसार (संकेतांक: २०१०१०२९१४३३३३४००१), सुट्ट्यांच्या कालावधीत काम करणाऱ्या शिक्षकांना कामाच्या समप्रमाणात अर्जित रजा मंजूर करण्याची स्पष्ट तरतूद आहे. मात्र, क्षेत्रीय पातळीवर याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने राज्यातील हजारो शिक्षक आपल्या हक्कापासून वंचित राहिले आहेत. यापूर्वी १२ जून रोजी दिलेल्या निवेदनावर प्रशासनाकडून कोणतीही हालचाल न झाल्याने अखेर हे स्मरणपत्र देण्यात आले आहे.



**प्रमुख मागण्या:**

- केलेल्या कामाच्या समप्रमाणात अर्जित रजा तात्काळ शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात याव्यात.
- ही बदली रजा पुढील शैक्षणिक वर्षात वापरण्याची किंवा संचयित () करण्याची सवलत मिळावी.
- संबंधित चार्ज अधिकाऱ्यांच्या ( ) प्रमाणपत्राच्या आधारे सेवापुस्तकात तात्काळ नोंद घेण्यात यावी.
- यासंदर्भात शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी व महानगरपालिका/नगरपरिषद प्रशासनाला कालबद्ध आदेश देण्यात यावेत.

‘‘शासकीय नियम आणि तरतूद अस्तित्वात असतानाही शिक्षकांना आपल्या हक्काच्या रजेसाठी कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागत आहेत, ही खेदजनक बाब आहे. शासनाने यावर तातडीने ठोस निर्णय न घेतल्यास राज्यभरातील शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष उसळेल.‘‘

---

### हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथे विकसित भारत संकल्प सभा व सेवाज्योत यात्रेचा शुभारंभ

## विकसित भारताचा संकल्प म्हणजे योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प : राहुल लोणीकर

**सेनगाव - प्रतिनिधी**

विकसित भारत सेवा संकल्प सभेच्या प्रसंगी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांतील विविध जनकल्याणकारी योजना आणि विकासकामांचा आढावा मांडला. ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास’ या मंत्राच्या माध्यमातून सेवा, सुशासन आणि जनकल्याणाला प्राधान्य देत शासनाच्या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

ते सेनगाव जि हिंगोली येथे भारत संकल्प सभा व सेवाज्योत यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते या वेळी खासदार रामराव वडकुते, आमदार प्रज्ञाताई सातव, भाजपा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे, यांची प्रमुख उपस्थिती होती

पुढे बोलताना,राहुल लोणीकर म्हणाले की, डीबीटी आणि आधार प्रमाणीकरणामुळे सरकारी योजनांमध्ये पारदर्शकता वाढली असून मोठ्या प्रमाणात बनावट लाभार्थी दूर झाले आहेत. गेल्या काही वर्षांत कोट्यवधी नागरिकांना विविध योजनांचा थेट लाभ मिळाला आहे. गरीब कल्याणाच्या दृष्टीने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतून ८१ कोटींपेक्षा अधिक नागरिकांना मोफत धान्याचा लाभ देण्यात आला. जनधन योजनेतून ५८ कोटींपेक्षा अधिक बँक खाती उघडण्यात आली असून त्यात मोठ्या प्रमाणावर महिला लाभार्थी आहेत.

शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, किसान क्रेडिट कार्ड यांसह विविध



योजनांच्या माध्यमातून आर्थिक आधार देण्यात आला आहे. पीएम-किसान योजनेतून ११ कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये थेट आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे. तसेच  ची कर्जमर्यादा वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना अधिक सुलभतेने भांडवल उपलब्ध होत असल्याचे राहुल लोणीकर यांनी नमूद केले.

पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, महिला सक्षमीकरणासाठी उज्ज्वला योजना, लखपती दीदी, सुकन्या समृद्धी योजना यांसारख्या योजनांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, कोट्यवधी महिलांना स्वच्छ इंधन, आर्थिक स्वावलंबन आणि मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक सुरक्षा मिळाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून कोट्यवधी कुटुंबांना पक्क्या घराचा आधार मिळाला असून आयुष्मान भारत योजनेतून गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना आरोग्य संरक्षण मिळाले आहे. डिजिटल इंडिया आणि सुशासनाच्या माध्यमातून सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढली आहे. नेटच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी देण्यात आली असून सारख्या डिजिटल व्यासपीठामुळे सरकारी खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढली आहे. वैद्यकीय शिक्षण, आरोग्य सुविधा, मिशन इंद्रधनुष, स्वच्छ भारत मिशन आणि जल जीवन मिशनच्या माध्यमातून देशाच्या मूलभूत सुविधांमध्ये मोठे परिवर्तन घडत असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री मुद्रा योजना, पीएम स्वनिधी, स्टँड अप इंडिया आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना यामुळे छोटे व्यावसायिक, फेरीवाले, पारंपरिक कारागीर तसेच अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांना आर्थिक पाठबळ मिळाले आहे. या योजनांमुळे रोजगारनिर्मिती आणि स्वयंरोजगाराला चालना मिळत आहे.

पुढे बोलताना लोणीकर यांनी केंद्राच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी विकासाभिमुख आणि पारदर्शक शासनाची गरज असल्याचे सांगितले.

गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, शेतकरी समृद्धी, डिजिटल परिवर्तन आणि सुशासनाच्या आधारावर विकसित भारताचा संकल्प साकार करण्याच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेवटी राहुल लोणीकर म्हणाले की, मोदी सरकारची १२ वर्षांची वाटचाल ही केवळ योजनांची आकडेवारी नसून ‘विकसित भारत’ घडविण्याच्या संकल्पाची पूर्तता करण्याच्या दिशेने सुरू असलेला ऐतिहासिक प्रवास आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.